# महाराष्ट्र पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन व नियोजन प्राधिकरण (महा कॅम्पा), नागपूर

वनभवन, तळ मजला, डी-विंग, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन, नागपूर ४४० ००१

ISO ९००१ : २०१५

ई-मेल: campams2010@gmail.com/apccfcampa@mahaforest.gov.in

Website: www.mahaforest.gov.in/campa

दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५५६९२०　　फॅक्स क्रमांक ०७१२-२५५०६७५


जा.क्रमांक कक्ष-कॅम्पा/प्र.क्र. ५२/ /२०२०-२१, दिनांक : ०४/०६/२०२१

## जाहिरात

## विवक्षित कामासाठी शासकीय सेवकांची सेवा करार पद्धतीने घेण्याबाबत.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : संकिर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (महा कॅम्पा) महाराष्ट्र राज्य या प्राधिकरणांतर्गत विवक्षित कामासाठी सेवानिवृत्त शासकीय सेवकांच्या सेवा करार पद्धतीने प्राप्त करण्यासाठी नामिकासूची (पॅनेल) तयार करण्याकरिता खालील तपशिलानुसार अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | विवक्षित कामाचे स्वरुप | सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा दर्जा व संख्या | कामाचा कालावधी | अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | पर्यायी वनीकरण निधी अधिनियम २०१६ व त्याखाली असलेल्या नियमावलीनुसार राज्य कॅम्पा प्राधिकरणातील e-Green Watch Portal संबंधी तसेच GIS व GPS संबंधी कामे हाताळणे. | विभागीय वन अधिकारी (सेवानिवृत्त)-१ | ११ महिन्याकरिता | वन विभागाच्या Portal मध्ये e-Green Watch संबंधातील माहिती, Polygon फोटो, नकाशे इत्यादी Upload करण्याकरिता संगणकीय प्रणालीचे तसेच GIS व GPS बाबतचे आवश्यक ज्ञान व त्याप्रणालीवर काम केल्याचा अनुभव. |
| २ | पर्यायी वनीकरण निधी अधिनियम २०१६ व त्याखाली असलेल्या नियमावलीनुसार राज्य कॅम्पा प्राधिकरणातील कार्यआयोजने अंतर्गत केंद्रस्थ अधिकारी यांचे कार्यासनातील कामाबाबत. | विभागीय वन अधिकारी (सेवानिवृत्त)-१ | ११ महिन्याकरिता | वन संवर्धन कायदा १९८० चे संपूर्ण ज्ञान, भूमी अभिलेख संबंधी माहिती तसेच वृत्तस्तरीय कार्यालय किंवा प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयातील वन संवर्धन कायद्याबाबतची प्रकरणे हाताळण्याचा कमीत-कमी १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| ३ | पर्यायी वनीकरण निधी अधिनियम २०१६ व त्याखाली असलेल्या नियमावलीनुसार राज्य कॅम्पा प्राधिकरणातील कार्यआयोजने अंतर्गत केंद्रस्थ अधिकारी यांचे कार्यासनातील कामाबाबत. | सहाय्यक वनसंरक्षक (सेवानिवृत्त)-१ | ११ महिन्याकरिता | सहाय्यक वनसंरक्षक या पदावर क्षेत्रीयस्तरीय कामाचा कमीत-कमी ५ वर्षांचा अनुभव |
| ४ | पर्यायी वनीकरण निधी अधिनियम २०१६ व त्याखाली असलेल्या नियमावलीनुसार राज्य कॅम्पा प्राधिकरणातील कार्यआयोजने अंतर्गत केंद्रस्थ अधिकारी यांचे कार्यासनातील कामाबाबत. | वनक्षेत्र सर्वेक्षक (सेवानिवृत्त)-१ | ११ महिन्याकरिता | वनक्षेत्र सर्वेक्षक या पदावर वनविभागाच्या क्षेत्रीयस्तरावरील कामाचा कमीत-कमी ५ वर्षांचा अनुभव. |

२.०० प्राप्त अर्जांपैकी पात्र अर्जदारांकडून वरील तक्त्यात दर्शविलेल्या संख्याप्रमाणे नामिका सूची तयार करण्यात येईल व आवश्यकतेनुसार सेवा प्राप्त करण्यात येईल. **अर्जदारास नागपूर येथे राहून सेवा प्रदान करावी लागेल.**

३.०० या संदर्भात शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकसंकेतांक २०१६१२१७१७१८२४१३०७ असा आहे.

४.०० नेणूक केलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना उपरोक्त शासन निर्णयातील ड(१) (क) मध्ये विहित केल्याप्रमाणे मासिक परिश्रमिक अनुज्ञेय राहील.

५.०० अर्जाचा नमुना **http://mahaforest.gov.in/campa/index/php** या web link वर उपलब्ध आहे.

६.०० अर्जाचा नमुना सोबत दिल्याप्रमाणे असून अर्जदारांनी अर्ज खालील कार्यालयीन पत्त्यावर टपालने दिनांक १८/०६/२०२१ पर्यंत पाठवावे.

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (महा कॅम्पा) महाराष्ट्र राज्य, नागपूर वनभवन, तळ मजला, बी-विंग, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन, नागपूर ४४०००१**

स्वा/-
(शैलेश टेंभुर्णीकर)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि
मुख्य कार्यकारी अधिकारी (महा कॅम्पा)
महाराष्ट्र राज्य